# नागरिकांना आवाहन

## मतदार नोंदणी अभियान

मा. भारत निवडणूक आयोगातर्फे ०१ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, या कार्यक्रमांतर्गतः-

१) ०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारा कोणताही नागरिक मतदार यादीत आपले नाव नोंदवू शकतो. तसेच दुबार/समान नोंदी वगळता येतील व आवश्यक असल्यास पत्त्यात अथवा नावात दुरुस्त्या करता येतील.

२) ०१ नोव्हेंबर,२०२१ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्यावर ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येतील. २०डिसेंबर,२०२१ पर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. ५ जानेवारी,२०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. हीच मतदार यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीकरिता ग्राह्य धरण्यात येणार आहे.

३) नागरिकांनी त्यांच्या संबंधित विधानसभा मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयात जावून मतदार नोंदणी करु शकता किंवा Online अर्ज करण्यासाठी www.nvsp.in या वेबसाईटवर जावून मतदार नोंदणी करावयाची सोय उपलब्ध आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मतदानाची सरासरी टक्केवारी वाढवण्यासाठी पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी कार्यक्रमात मोठया प्रमाणात भाग घ्यावा.

**मा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**